# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3533 / शि.वि. / 2017
दि. 12/01 / 2017

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :– 03 जानेवारी ते 26 जानेवारी, 2017 या कालावधीत शाळांमध्ये ''ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा'' अभियान राबविण्याबाबत.**

**संदर्भ** :– महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परीपत्रक क्र. संकीर्ण 2016 / प्र.क्र.373–एस.डी.4, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगूरू मार्ग, मंत्रालय, मुंबई दि. 30 डिसेंबर 2016.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ''विद्या हे धन आहे रे श्रेष्ठ साऱ्या धनाहून तिचा जयापासी, आहे तो खरा धनवान'' अश्या या शब्दात शिक्षणाचे महत्व सांगून स्त्री शिक्षणासाठी अहोरात्र सावित्रीबाई फुले यांनी जे कार्य केले त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. अज्ञान, अनिष्ट रूढी व परंपरांच्या विळख्यात गुरफटलेल्या समाजात स्त्रीकडे तुच्छ व उपभोग्य वस्तू म्हणून पाहिले जात होते. अशा या काळात समाजाची वक्रदृष्टी स्वीकारून स्त्रीयांना चूल व मूल यातून बाहेर काढण्यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पूण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढून सामाजिक परीवर्तन चळवळीचा पाया घातला. सावित्रीबाई फुले यांच्या महान शैक्षणिक कार्याची ओळख शाळांतील विद्यार्थ्यांना व्हावी व त्यांच्या कार्याची प्रेरणा मिळावी यासाठी राज्यातील सर्व शाळांमधून ''ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा अभियान'' राबविण्यात येते. दरवर्षी प्रमाणे दि.03 जानेवारी ते 26 जानेवारी 2017 पर्यंत संपूर्ण राज्यात हे अभियान राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत मुलींना शिक्षण देण्यास प्रेरणा देण्याकरीता, त्यांच्यात आत्मविश्वास रूजविणे, वैचारीक व तार्कीक क्षमता निर्माण करणे, शारीरीक क्षमता वाढीस लावणे त्यांच्या सृजनशीलतेस वाव देणे याकरीता आपल्या शाळेत चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, गायन स्पर्धा, निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, कार्यानुभव स्पर्धा, विविध खेळांच्या स्पर्धा विशेषतः मुलींकरीता आयोजित करून त्यात उत्कृष्ठ ठरणाऱ्या मुलींना बक्षिस देवून प्रोत्साहीत करावे. तसेच मुलींच्या शारीरीक आरोग्याबाबत उदभवणाऱ्या समस्यांवर तज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करावे. केलेल्या कार्यवाहीचा फोटोसहित अहवाल आपल्या झोनचे शाळा निरीक्षक यांना दि. 28.01.2017 पर्यंत सादर करावा.

**टिप :– शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती योजनाकरीता शालेय विद्यार्थ्यांचे आधारकार्ड लिंक असणे अत्यावश्यक आहे. तरी आपल्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड क्रमांक स्टुडंट पोर्टवर लिंक करावे.**

(फारूक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :–**

1) मा.उपायुक्त, म.न.पा., नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर.
2) शाळा निरीक्षक, झोन क्र.1 ते 10, म.न.पा., नागपूर आपण उपरोक्त अभियानाबाबत आढावा घेवून शाळा अहवाल सादर करावा.